Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 515 – 518
DOI: 10.5281/zenodo.10136938

Original Research Article

# बेरोजगारी निवारणार्थ महात्मा गांधींच्या विचारांची प्रासंगिकता

प्रा. डॉ. सचितानंद एस. बिचेवार, [1] प्रा. डॉ. शिवराम जाधव

[1]श्री पी. डी. जैन महाविद्यालय, अनसिंग, ता. जिल्हा वाशीम ४४४५०७ महाराष्ट्र, भारत

[2]पीपल्स महाविद्यालय, नांदेड ४३१६०५ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: [1]bichewarss@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## सारांश

आज जग एका महत्वाच्या टप्प्यावर उभे आहे. प्रचंड झगमगत, दिखावा, भौतिक प्रगतीचे कोडकौतुक तर दुसरीकडे भयानक दारिद्र्य, निराशा, अज्ञान, आणि त्यातून निर्माण झालेल्या द्वेष मानव जातीला सुख समाधानाने जगू देते की नाही या बाबत शंका आहे. त्यातच भारतासारख्या देशात प्रचंड उर्जा असणारा तरुण मात्र हाताला लायक काम नाही म्हणून बेकार आहे. त्यावर आमच्या बापूंची वैचारिक मात्रा निश्चितच उपयोगी ठरणार आहे. महात्मा गांधींच्या विचारधारेत विकेंद्रीत अर्थव्यवस्थेवर विशेष भर दिलेला असून त्यांच्या स्वराज्याच्या कल्पनेत स्वयंपूर्ण खेड्याचा विचार, स्वदेशी उद्योगांना संरक्षण व बेकारी निवारण्यास प्राधान्य दिलेले आहे. सद्यस्थितीत बेरोजगारीची समस्या गंभीर स्वरूपात उभी असून तिच्या निवारणार्थ गांधी विचाराची अत्यंत आवश्यकता आहे.

## प्रस्तावना

भारतात गेल्या काही वर्षापासून बेरोजगारीचे प्रमाण सातत्याने वाढत चालले आहे. भारतातील बेरोजचा दर जगातील इतर अनेक देशापेक्षा अधिकच आहे. नोकऱ्यांची संख्या दिवसेंदिवस घटत असून नोकरी मागणारे संख्या मात्र गुणाकाराच्या पटीने वाढत आहे. महाराष्ट्रात तर सरकारी नोकर भरतीसाठी अर्ज करणाऱ्यांची संख्या हजारो, लाखो वर पोहोचलेली आहे. देशातील ही बेरोजगारीची समस्या निवडणुकीचा मुद्दा बनली आहे. बेरोजगारीच्या समस्येने सामाजिक समस्येचे स्वरूप धारण करून ती आता राष्ट्रीय समस्या बनत चालली आहे. केंद्र सरकारची `मेक इन इंडिया` सारखा उपक्रमही समस्या निवारणार्थ कुचकामी ठरला आहे. बेरोजगार तरुणाई नोकरीच्या आशेने आरक्षण टिकविण्याचा तसेच मागणीच्या आंदोलनात जातनिष्ठेने संघटित होत आहे. बेरोजगारीच्या समस्येवरील आतापर्यंत रोजगार हमी योजनेसारख्या सरकारी योजना निरुपयोगी ठरल्या आहेत. या समस्येचे मूळ व तिची कारणे अर्थतज्ञ अनेक असल्याची सांगतात. केवळ जीडीपी वाढ म्हणजे देशाचा विकास नसून सर्वांना शिक्षण, सकश आहार, पाणी, आरोग्याच्या सुविधा,

रोजगाराच्या संधी उपलब्ध असणे म्हणजे विकास होय. भारतात उत्पन्नाचे व संपन्न संपत्तीचे असमान वाटप प्रचंड स्वरूपात आहे. त्यामुळे दारिद्र्य आणि बेरोजगारीचे प्रमाण हे सातत्याने वाढत आहे. अदृश्य बेरोजगारी, हंगामी बेरोजगारी, सुशिक्षितांची बेरोजगारी अशा बेरोजगारीची वाढते प्रमाण एक चिंताजनक बाब आहे. खेड्यातील लोकसंख्या रोजगारासाठी शहरांमध्ये स्थलांतरित होऊन निर्वाचिताप्रमाणे राहत असून खेडे ओसाड पडलेली दिसत आहेत. या समस्येकडे राज्यकर्त्यांचे अजिबात लक्ष नाही. त्यासाठी सरकारने कोणत्या ठोस उपयोजनासाठी केलेल्याही दिसत नाहीत. याच पार्श्वभूमीवर गांधी विचारधारेत या समस्येवरील काही उपाययोजना शोधण्याचे अगत्याचे ठरते. कारण गांधी विचारधारेत स्वदेशी, ग्रामोद्योग, ग्राम स्वराज्य, विकेंद्रिकरण अशा संकल्पनावर विशेष भर दिलेला आहे. या दृष्टीने प्रस्तुत संशोधन लेखात बेरोजगारी निवारणार्थ गांधीच्या विचाराची प्रासंगिकता अधोरेखित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधनाचे उद्देश**

१. बेकारी निवारण्याच्या संदर्भात म. गांधीच्या विचाराचा शोध घेणे.
२. महात्मा गांधींच्या विचारांची प्रासंगिकता शोधणे.
३. महात्मा गांधींच्या आर्थिक विचाराचा अभ्यास करणे.
४. महात्मा गांधींच्या विचारातील सर्वोदय, ग्रामस्वराज्य, ग्रामोद्योग, खादी, रचनात्मक कार्य, स्वदेशी, रामराज्य या संकल्पनांचा पुनर्विचार करणे.
५. महात्मा गांधीच्या विचारातून बेरोजगारीच्या समस्येवर उपाययोजना सांगणे.

**गृहितके**

१. सद्यस्थितीत बेरोजगारी निवारणार्थ म. गांधीचे विचार उपयोगी पडतील.
२. म. गांधीचा आर्थिक विचार समजून घेणे आजही अत्यंत महत्त्वाचे आहे.
३. गांधीच्या विचारातील सर्वोदयाची संकल्पनांचा पुनर्विचार करून बेरोजगारीच्या समस्येला दूर करण्यासाठी उपाय उपाययोजना करता येते.
४. महात्मा गांधीचे विचार आजही प्रासंगिक आहेत.

**भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पर्याय सर्वोदय**

आज जगात दोन अर्थव्यवस्था प्रचलित आहेत. एक भांडवलशाही अर्थव्यवस्था व दुसरी समाजवादी अर्थव्यवस्था. या दोन्हीचा समन्वय साधून भारताने मिश्र अर्थव्यवस्था अंगीकारली तरी खाजगी भांडवल आणि व्यक्तिगत नफा या दोन मूळ परिणाम असलेली भांडवलशाही व्यवस्था लोकशाहीचा बुरखा घेऊन मजबूत होत चाललेली दिसते. समाजवादी अर्थव्यवस्थेतही यांत्रिकीकरणावर भर असून हिंसावर वर्ज्य नाही. गांधीजी मात्र सर्वांचे कल्याण साधणारा सर्वोदयाचा विचार मांडला. *ज्यात वेतन, कामगाराचे रुपांतर स्वयंरोजगारी कामगार होते. ते स्वाभाविकच शोषणमुक्त असतात आणि तेही इतर कोणाचे शोषण करत नाहीत.[1] मुळातच विकासाच्या प्रचलित कल्पनापेक्षा गांधी विचारातील कल्याणाची कल्पना श्रेष्ठ दर्जाची आहे. ज्यात नैतिकता आणि शोषणमुक्तीचा विचार अंतर्भूत आहे. या विचारधारेपासूनच भारत दूर गेल्यामुळे बेरोजगार, बेरोजगारीची समस्या निर्माण झालेली आहे.

**यांत्रिकीकरणावर मर्यादा**

औद्योगिक क्रांती नंतर भांडवलशाही आली भांडवल, अधिक उत्पादन, कारखाने, यंत्र, प्रचंड उत्पादन या सोबतच शोषण व विषमता ही आली. यास पर्याय म्हणून कम्युनिझम आला, पण तोही यांत्रिकीकरणावर भर देणाराच असल्यामुळे शोषणाला पर्याय देऊ शकला नाही. पुढे जागतिकीकरणानंतर यांत्रिकीकरणाचा वेग प्रचंड वाढवून माणसाच्या हाताला कामच ठेवले नाही. यातून शोषण, चगंळवाद, हिंसाचार दहशतवाद, जोमाने वाढला. आणि गरिबांच्या वाट्याला मात्र दारिद्र्य- बेरोजगारी आलेली आहे. याविषयी गांधीवादी विचारवंत वासंती सोर म्हणतात, "शंभर वर्षांपूर्वीच हिंद स्वराज्य या पुस्तकात गांधींनी धोक्याची इशारी देऊन ठेवले होते"[2] म. गांधीचा यांत्रिकीकरणाला विरोध व खादी पुरस्कार याविषयी फार गैरसमज होते ते आजही आहेत. महात्मा गांधी प्रगतीच्या घड्याळाचे काटे उलट्या दिशेने फिरवत आहेत असे आजही टीका करणारे समजतात. गांधीजींनी खादी विषयी आपली भूमिका रवींद्रनाथ टागोरांना कळविली होती की, “निर्वस्त्र जनतेला त्यांना गरज नसलेली वस्त्रे देऊन त्यांचा अपमान करणे मी टाळायला हवे, त्या ऐवजी त्यांना त्यांची खरोखरच गरज आहे असा रोजगार मिळून द्यायला हवा. [3] अर्थातच गांधीजींच्या आर्थिक विचारात यंत्रापेक्षा शरीर श्रमाला अधिक महत्त्व आहे. त्या दृष्टीने श्रमशक्तीचा विधायक उपयोग करून बेरोजगारी निवारण्याचा प्रयत्न करायला हवा.

**ग्रामोद्योग व नई तालीमच्या आधारे ग्राम पुनर्रचना**

महात्मा गांधींच्या आर्थिक विचारात यंत्रसामग्रीला विरोध आह, तसा समानतेचा आग्रही आहे. यास्तव स्वदेशी उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी कुटीर उद्योगाचा पुरस्कार केला. यासाठी त्यांनी ग्रामोद्योग संघ, अखिल भारतीय चरखा संघ अशा संस्थांची निर्मिती केली. शेती व्यवसाय हंगामावर आधारित असल्याने बेरोजगारीचे प्रमाण भरपूर होते. याशिवाय इंग्रजी राजवटीने हस्तव्यवसायाचाही र्हास झालेला होता. यामुळे कारागिरही बेकार बनले होते. म्हणून ग्रामीण उद्योगधंद्याचे पुनरुज्जीवन करणे हाच खेड्यातील बेकारीवर दारिद्र्य नष्ट करण्याचा मार्ग आहे अशा निष्कर्षापर्यंत गांधी येऊन पोहोचले होते. यासाठी त्यांचा पूर्वी असलेला संपूर्ण यंत्रविरोध ही त्यांनी शिथिल केला होता. पण भारतीय स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही भांडवलशाही पद्धतीच्या औद्योगीकरणातून भारतातील बेकारीच्या प्रश्न सुटण्याची शक्यता नाही हे अधिकाधिक स्पष्ट होत आहे. या संदर्भात महात्मा गांधीच्या ग्रामोद्योग व नई तालीमचा विचार करायला हवा. गांधीजींच्या मते, गावात मुलांना आधुनिक, शहरी, निरोपयोगी शिक्षण मिळणार नाही तर समाजउपयोगी श्रम प्रतिष्ठा जपणारे मुलउद्योगी शिक्षण मिळेल जे स्वाश्रयी असेल. विद्यार्थी दशेतच मुलौद्योगा मार्फत उत्पादन परिश्रमाची सुरुवात करणे हा त्यातील आर्थिक आशय.[4]

**शहरीकरणावर नियंत्रण**

बेरोजगारी निवारण्याच्या उपाययोजनामध्ये जे उपाय योजले जात आहेत ते सर्व वाढत्या शहरीकरणामुळे निष्प्रभ ठरत आहेत. खेड्यांचे शहराकडून शोषण होत असते, ते महात्मा गांधीच्या काळात होत होते ते आजही होताना दिसते. महात्मा गांधींच्या दृष्टीने अहिंसक समाज निर्मितीसाठी आदर्श खेडे उभे राहणे गरजेचे आहे. 1937 मध्ये हरिजन मधून उभे केलेले आदर्श खेड्याचे चित्र हे व्यवहारिक तपशीलाने भरलेले आहे.[5] त्यांच्या दृष्टीने हे ग्रामराज्यच ‘रामराज्य’, होते. तेथे उत्पादनाचा अतिरेक नसून गरजेपुरते उत्पादन असेल, नफेखोरी, जाहिरातबाजी फसवणूक, हिंसा, कोर्ट, गुन्हेगारी

इत्यादींना अजिबात थारा नसेल. हे गांधीजींचे विचार अमलात आणण्यासाठी त्यांनी ज्या शहरी संस्कृतीला हिंद स्वराज्यमध्ये 'सैतानी' म्हटले तिला आवर घालावा लागेल. जे पर्यावरणाच्या दृष्टीनेही आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

भारतामध्ये चक्रीय बेरोजगारी, अदृश्य बेरोजगारी, संक्रमणात्मक बेरोजगारी, सुशिक्षितांची बेरोजगारी, शैक्षणिक बेरोजगारी इत्यादी बेरोजगारी प्रमाण वाढत आहे. यामुळे तरुण वर्ग निराशेच्या गर्तेत लोटल्या जात आहे. अशामध्ये शिक्षितांचे प्रमाण अधिक आहे. महात्मा गांधीजींच्या विचारांमध्ये यावर उपाय योजनेसाठी काही मार्ग निश्चितच सापडतो. त्यासाठी सर्वोदय समाज रचना, यांत्रीकीकरणावर व शहरीकरणावर नियंत्रण घालून नई तालीम  व ग्रामीण उद्धोगाचे  पुनर्जीवन करण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ व टीपा**

१. दिलीप कुलकर्णी, (संपा) गांधी उद्यासाठी, राजहंस प्रकाशन, पुणे - 2019 प्रथम पृ. 71

२. सोर वासंती, 21 व्या शतकातील गांधी, परमधाम प्रकाशन, पवनार 2010 पृ. 23

३. पीटर गोसाल्वीस, अन्योक्ती वाडेकर (अनु) खादी गांधीच्या क्रांतीचे महाप्रतीक, न्यू दिल्ली, 2019 पृ. 73

४. सौर वासंती, उपरोक्त, पृ. 98

५. गोखले द.न., गांधीजी मानव नी महामानव, मौजे प्रकाशन गृह, मुंबई 2008, पृ. 249